# GONDWANA UNIVERSITY, GADCHIROLI

(Established by Government of Maharashtra Notification No. MISC -2007/(322/07) UNI -4 Dated 27th Sept. 2011 State University Governed by Maharashtra University Act, 1994 )

## Office of the Director Students' Welfare

**Dr.I.S. Mohurley**
**Director**
Mobile: 7774027661, 9422893555

MIDC Road, Complex, GADCHIROLI – 442 605 (M.S)
web: unigug.org/ gondwana.digitaluniversity.ac
**Email :** director.studentwelfaregug@ gmail.com


**पत्र क्र. No.GU/DSW/126/2015** **Dt:18/09/2015**

प्रति,

१) मा. प्राचार्य,
सर्व संलग्नित महाविद्यालये,

२) मा. विभागप्रमूख,
पदव्युत्तर शैक्षणिक विभाग,
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

**विषय: महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी कल्याण सल्लागार समितीचे गठन व विद्यार्थी कल्याण अधिकारी नामनिर्देशन.**

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयान्वये आपणास कळविण्यात येते की, विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये व पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या संस्कारक्षम व कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी कल्याणार्थ योजना कार्यान्वित करण्यासाठी /कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरू शकेल अशी विद्यार्थी कल्याण सल्लागार समिती असणे आवश्यक आहे. तसेच समितीने घेतलेल्या विधायक निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणी करिता महाविद्यालयाने एका कर्तव्यदक्ष व निष्ठावान सहाय्यक / सहयोगी प्राध्यापकाचे विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणून विद्यार्थी कल्याणार्थ उपक्रम / कार्यक्रम राबविणेसाठी मा. प्राचार्यांनी या कामासाठी नामनिर्देशन करावे. विद्यार्थी कल्याण सल्लागार समिती व विद्यार्थी कल्याण अधिकारी बाबत मार्गदर्शक तत्वे विद्यापीठाच्या www.unigug.org व www.gondwana.digitaluniversity.ac या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

करिता मा. कुलगुरु महोदयांच्या आदेशान्वये संलग्नित महाविद्यालयांनी विद्यार्थी कल्याण सल्लागार समिती गठन करावी व विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याचे नामनिर्देशन करावे आणि कार्यवाही अहवाल संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयास सादर करावा, हि विनंती.

धन्यवाद!

(डॉ. ईश्वर श्रा. मोहुर्ले)
संचालक विद्यार्थी कल्याण
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

संचालक
विद्यार्थी कल्याण विभाग
गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली

**सहपत्रे:– वरीलप्रमाणे**

**प्रत माहितीस्तव :–**

१. **मा. कुलगुरु, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**
२. **मा. कुलसचिव, गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.**

# विद्यार्थी कल्याण समिती व विद्यार्थी कल्याण अधिकारी

**प्रस्तावना :**

उच्च शिक्षणाचा केंद्रबिंदू असलेल्या सुशिक्षित तरुणांच्या मनावर मानवी मूल्यांचे संस्कार होतील अशा योजना विद्यापीठांनी कार्यान्वित केल्या पाहिजेत अशा अनेक अपेक्षा डॉ. सर्वपल्ली राधाकृष्ण यांच्या अध्यक्षतेखाली नियुक्त केलेल्या आयोगाने मांडल्या आहेत. विद्यापीठे कशी असावीत, ध्येय धोरण कसे असावे याबाबतही आयोगाने विचार मांडले आहेत.

गोंडवाना विद्यापीठाच्या स्थापनेपासूनच विद्यार्थी कल्याण विभाग कार्यरत आहे. विद्यापीठाच्या महत्वपूर्ण अशा समाजनिष्ठा, राष्ट्रीय एकात्मता, शीलसंवर्धन, समता, समाजसेवा या उद्दिष्टपूर्तीच्या बाबतीत प्रचलित शिक्षण पध्दतीद्वारा शैक्षणिक उपक्रमाबरोबरच शिक्षणेत्तर उपक्रमांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांचा सर्वांगिण विकास करता यावा या उदात्त हेतूने महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ च्या कलम (२१) अन्वये नामनिर्देशित झालेल्या संचालकांच्या मार्गदर्शनाखाली विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण विभागाद्वारा विविध उपक्रमांचे आयोजन केले जात आहे.

विद्यापीठाशी संलग्न असलेली सर्व महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या पदव्युत्तर शैक्षणिक विभागामध्ये उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी विविध प्रकारच्या संस्कारक्षम व कल्याणकारी योजना राबविण्यात येत असून आवश्यकतेनुसार नवीन योजना तयार करणे व त्यांची अंमलबजावणी करणे यासाठी विद्यार्थी कल्याण विभागाच्या कामकाजातील काही वैशिष्टये खालीलप्रमाणे आहेत.

१) विद्यार्थ्यांसाठी कल्याणकारी विविध उपक्रमांचे विद्यापीठ व महाविद्यालय स्तरावर आयोजन करणे.
२) विद्यार्थ्यांना विविध प्रकारच्या आंतर–विद्यापीठीय स्पर्धांमध्ये सहभागी होण्यासाठी संधी उपलब्ध करुन देणे. याकरीता आंतरमहाविद्यालयीन व गरज भासल्यास विभागीय स्तरावर सांस्कृतिक स्पर्धांचे आयोजन करणे.
३) राष्ट्रीयदृष्टया महत्वाचे उपक्रम संलग्रित महाविद्यालयामध्ये राबविण्यासाठी विद्यार्थ्यांना प्रोत्साहीत करणे व महाविद्यालयांना सहकार्य करणे.
४) विद्यार्थ्यांचा सामाजिक, सांस्कृतिक व वाङ्.मयीन व्यासंग वसढविण्याकरीता प्रयत्न करणे.
५) महाराष्ट्र विद्यापीठ कायद्यानुसार दरवर्षी निवडणुक प्रक्रिया राबवून विद्यार्थी परिषदेची स्थापना करणे.
६) राज्य सरकार व केंद्र सरकारच्या विविध योजना व उपक्रम इत्यादींची माहिती महाविद्यालयांना देणे व मार्गदर्शन करणे.
७) विद्यार्थ्यांना विद्यापीठाच्या नियमानुसार विविध निधीमधून आर्थिक सहाय्य उपलब्ध करुन देण.

**महाविद्यालय स्तरावर सल्लागार समिती**

महाविद्यालय स्तरावर विद्यार्थी कल्याणार्थ योजना कार्यान्वित करण्यासाठी/कार्यक्रम राबविण्यासाठी मार्गदर्शक ठरु शकेल अशी खलीलप्रमाणे रचना असलेली सल्लागार समिती असावी. ही समिती वर्षभरात राबविण्यात येणाऱ्या कार्यक्रमांचे वेळापत्रक ठरवून कार्यक्रमांचे नियोजन व आयोजन सुव्यवस्थितरित्या होत किंवा नाही यावर लक्ष ठेवील व मार्गदर्शक सुचना करेल.

| | | |
|---|---|---|
| १. | प्राचार्य | —अध्यक्ष |
| २. | संस्था चालकांचे प्रतिनिधी | —एक सदस्य |
| ३. | विद्यार्थी कल्याण अधिकारी | —सचिव |
| ४. | प्राध्यापिका प्रतिनिधी | —एकसदस्य |
| ५. | रासेयो कार्यक्रम अधिकारी | —सदस्य |
| ६. | राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी असल्यास | —सदस्य |
| ७. | शारीरिक शिक्षण संचालक | —सदस्य |
| ८. | विद्यार्थी प्रतिनिधी (विद्यार्थी परिषदेचे सचिव) | —सदस्य |

९. विद्यार्थीनी प्रतिनिधी —एक सदस्य
१०. महाविद्यालयीन शिक्षकेत्तर कर्मचारी —एक सदस्य
११. स्थानिक समाजसेवक —एक सदस्य

उपरोक्त समितीसाठी सदस्य नियुक्तीचा अधिकार प्राचार्यांना असेल. समितीचा कार्यकाळ एक वर्षाचा राहील. कार्यकाळ संपल्यानंतर नविन समिती गठीत करण्यात यावी. वर्षातून समितीच्या किमान चार बैठका आयोजित करण्यात याव्यात.

## विद्यार्थी कल्याण अधिकारी (Student Welfare Officer)

सल्लागार समितीने घेतलेल्या विधायक निर्णयांच्या प्रभावी अंमलबजावणीकरीता महाविद्यालयाने एका कर्तव्यदक्ष व निष्ठावान सहाय्यक/सहयोगी प्राध्यापकाची विद्यार्थी कल्याण अधिकारी (SWO) म्हणून विद्यार्थी कल्याणार्थ उपक्रम/कार्यक्रम राबविणेसाठी तसेच विद्यार्थी परिषद व विद्यार्थी हिताच्या दृष्टीने संबंधीत अन्य कार्य सांभाळण्याकरिता आणि दैनंदिन कामकाज पाहण्याकरिता प्राचार्यांनी नामनिर्देशनाने नियुक्ती करावी.

या करिता खालील बाबींचे पालन होणे आवश्यक आहे

१. सदर प्राध्यापक (SWO) वरिष्ठ महाविद्यालयातील सेवेत मान्यताप्राप्त असणे आवश्यक आहे. कायम स्वरुपी सेवेत असणाऱ्या प्राध्यापकास प्राधान्य द्यावे.
२. विद्यार्थी हिताच्या कल्याणकारी योजना राबविण्याबद्दल त्याला आवड असावी.
३. विद्यार्थी कल्याण अधिकाऱ्याची नियुक्ती ०३ वर्षासाठी करावी.
४. मा. संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयाकडून प्राप्त सुचनांचे यथायोग्य पालन या अधिकाऱ्याने करण्याबाबत नियुक्तीपत्रात स्पष्ट नमुद करावे. त्याची एक प्रत मा. संचालक विद्यार्थी कल्याण यांचे कार्यालयास पाठवावी.
५. राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी (NSS), राष्ट्रीय छात्रसेना अधिकारी (NCC) आणि शारीरिक शिक्षण संचालक यांची विद्यार्थी कल्याण अधिकारी म्हणुन नियुक्ती करु नये.
६. विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी ''कमवा व शिका'' योजना व अन्य योजनांचे दैनंदिन कामकाज पाहावे.
७. विद्यार्थी कल्याणार्थ विद्यापीठाच्या विद्यार्थी कल्याण विभागाच्या विविध योजना/कार्यक्रम महाविद्यालयात प्रभावीपणे राबविणे व त्याबाबतचे अहवाल विद्यार्थी कल्याण विभागास निवडक पेपर कात्रणे व फोटोसह पाठविणे आवश्यक आहे.
८. जे विद्यार्थी कल्याण अधिकारी उत्कृष्टपणे व प्रभावीपणे कार्यक्रम राबवतील त्याना गोंडवाना विद्यापीठाकडून प्रस्ताव सादर केल्यास तीन वर्षाच्या कालावधीनंतर उत्कृष्ट सेवेबद्दल प्रशस्तीपत्र प्रदान करण्यात येईल.
९. सल्लागार समितीच्या बैठकींच्या इतिवृत्ताची विद्यार्थी कल्याण अधिकारी यांनी नोंद ठेवावी.

**डॉ. ईश्वर एस. मोहुर्ले**
**संचालक विद्यार्थी कल्याण**

**डॉ. विनायक एस. ईरपाते**
**कुलसचिव**